# शाश्वत उपजिविका आणि जैवविविधता संवर्धन यांचा सुवर्णमिलाफ

**प्रस्तावना :** तटीय आणि सागरी जैवविविधता संवधर्नासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत वापर करणे अतिशय महत्वाचे आहे. शाश्वत उपजिविकांच्या संधी स्थानिक मच्छिमारांना उपलब्ध व्हाव्यात यासाठी महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कांदळवनक्षेत्रातील खेकडा पालन उपक्रम राबविला जात आहे. यासाठी **'समुद्री उत्पाद व निर्यात केंद्र'** या भारत सरकारच्या अंतर्गत कार्यरत असणा-या **'नेटफिश'** संस्थेमार्फत तांत्रिक सहकार्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**पध्दत :**

नैसर्गिक अधिवासात सिल्ला सिरेटा व सिल्ला ऑलिव्हेसिया या प्रजातीचे खेकडे सोडणे

बीज उत्पादन केंद्रात निर्मित वरील प्रजातीच्या खेकडयांचे पॉंड व बंदिस्त क्षेत्रात संवर्धन

सिल्ला सिरेटा, सामान्यतः चिखलातील खेकडा किंवा कांदळवनातील खेकडा म्हणून ओळखला जातो आणि याला जगभरात विशेषतः दक्षिण पूर्व आशियामध्ये मोठी मागणी आहे.

**वैशिष्टये:**

सदर उपक्रम पहिल्या टप्प्यामध्ये ( सन २०१३-१४) मध्ये मालवण,देवगड व वेंगुर्ला तालुक्यातील ६ गावांमध्ये ७ विविध ठिकाणी राबविण्यात आला. दुस-या टप्प्यामध्ये (सन २०१४-१५) मध्ये उपक्रमाची व्याप्ती वाढवून तीन तटीय तालुक्यातील १५ गावांमध्ये राबविण्यात येत आहे.



खेकडा संवर्धनासंबधी स्थानिकांमध्ये जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन



लाभार्थी गट निवडीसाठी गावपातळीवरील बैठकीचे आयोजन



खेकडा संवर्धनासाठी वाडातर, देवगड तालुक्यातील बंदिस्त केलेल (पेन) क्षेत्र



राजीव गांधी जलकृषी केद्र,तामिळनाडू येथे प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेले प्रशिक्षणार्थी



वाडातर, ता. देवगड येथील गटाने घेतलेले खेकडयाचे उत्पादन




वाडातर, ता. देवगड येथील गटाने घेतलेले १२२५ ग्रॅम वजनाचा खेकडा